# देवगिरी मिरर

• संपादक : राम गंगाराम तरटे •

• साप्ताहिक • नांदेड • वर्ष १ ले • अंक २० वा • मंगळवार, दिनाक १४ एप्रिल २०२६ • RNI No. MAHMAR/25/A2579 • पाने ४ • किंमत : २ रुपये

• Weekly • Nanded • Year - 01 • Issue No.20 • Tuesday, Date 14 April 2026 • RNI No. MAHMAR/25/A2579 • Page 4 • Price : 2 ₹


## थोडक्यात

### आशा भोसलेंचे स्वप्न राज्य सरकार पूर्ण करणार

**मंत्रिमंडळात घेतला मोठा निर्णय**

मुंबई : भारताच्या ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांचे वयाच्या ९३ व्या वर्षी निधन झाले आहे. आशा भोसले यांचे राजकीय नेतेमंडळींसोबतचे नाते नेहमीच चांगले राहिले आहे. त्यांचा अनेक कार्यक्रमात राजकीय नेतेमंडळींच्याच हस्ते सत्कारही झाला आहे. आता आशा ताईंच्या निधनाच्या दुसऱ्याच दिवशी राज्य सरकारच्या मंत्रिमंडळात त्यांच्या संदर्भात मोठा आणि महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारने मुंबईत आशा भोसले संगीत अकॅडमी स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारच्यावतीने मुंबईत 'आशा भोसले संगीत अकॅडमी' स्थापन करणार आहे. राज्य सरकारकडे वांद्रे-अंधेरी दरम्यान हक्काची जागा उपलब्ध करून देण्याची आशा भोसले यांनी मागणी केली होती. मुख्यमंत्र्यांनी बोलताना आशाताईंनी दिलेला प्रस्तावच आपण पुढे नेऊ असे सांगितले. त्यामुळे, आता वांद्रे-अंधेरी दरम्यान आशाताईंच्या नावाने संगीत अकॅडमी' उभारण्यात येणार असल्याचे निश्चित झाले आहे.

# भीमसागर उसळणार

## भीमजयंतीची नांदेडमध्ये जय्यत तयारी

नांदेड (प्रतिनिधी): डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नांदेड शहरात यंदा अभूतपूर्व उत्साह आणि जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले असून संपूर्ण शहर भीममय झाले आहे. १४ एप्रिल रोजी साजऱ्या होणाऱ्या या जयंतीनिमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमांचे मोठ्या प्रमाणावर आयोजन करण्यात आले असून, यंदा नांदेडमध्ये भीमसागर उसळणार असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे.




शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि सार्वजनिक ठिकाणे आकर्षक रोषणाई, निळ्या झेंड्यांनी तसेच डॉ. आंबेडकरांच्या भव्य प्रतिमांनी सजविण्यात आली आहेत. शिवाजीनगर, वजीराबाद, भगतसिंग चौक, आणि इतर प्रमुख भागांत सजावट आणि स्वागत कमानी उभारण्यात आल्या आहेत. विविध भागांतून येणाऱ्या अनुयायांसाठी पाणी, शरबत आणि अल्पोपहाराची व्यवस्था स्थानिक मंडळांकडून करण्यात आली आहे.

यंदाच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणुका हे मुख्य आकर्षण ठरणार असून हजारो भीमसैनिक निळे झेंडे, बॅनर्स आणि ढोल-ताशांच्या गजरात सहभागी होणार आहेत. पारंपरिक वेशभूषा, झांज पथक, लेझीम पथक आणि ञा च्या तालावर तरुणाईचा उत्साह शिगेला पोहोचणार आहे. महिला आणि मुलींचाही मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून येणार आहे. अनेक ठिकाणी आंबेडकरी गीतांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जाणार आहेत.

याशिवाय, सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदान शिबिरे, मोफत आरोग्य तपासणी, वृक्षारोपण, तसेच गरजूंसाठी अन्नदान कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. बुद्ध विहारांमध्ये धम्मचक्र प्रवर्तन, प्रार्थना आणि ग्रंथ वाचनाचे कार्यक्रम आयोजित केले जातील. विद्यार्थ्यांसाठी निबंध, वक्तृत्व आणि सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात येत असून, डॉ.आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करण्यावर विशेष भर दिला जात आहे.

सुरक्षा आणि वाहतूक व्यवस्थेसाठी पोलीस प्रशासनाने कडक बंदोबस्त ठेवला असून शहरात ठिकठिकाणी पोलीस तैनात करण्यात आले आहेत. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी काही मार्गांवर बदल करण्यात आले असून नागरिकांना प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. एकूणच, नांदेडमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी होणार असून, शहरात उसळणारा भीमसागर सामाजिक एकतेचा आणि विचारप्रबोधनाचा संदेश देणार आहे.



## 'कोलाज भावनांचा' कवितासंग्रहास राष्ट्रसंत गाडगे बाबा पुरस्कार

नांदेड : संवेदनशील कवयित्री रुचिरा बेटकर यांच्या कोलाज भावनांचा या कविता संग्रहाला शिर्डी येथील डेबूजी फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणारा राष्ट्रीय राष्ट्रसंत श्री गाडगेबाबा साहित्य पुरस्कार २०२६ जाहीर झाला आहे.

'कोलाज भावनांचा ' हा रुचिरा बेटकर यांचा पहिलाच कविता संग्रह असून मानवी मनातील भावनांचा कोलाहल त्यांनी या कविता संग्रहातून साकारल्या आहेत . त्यांच्या या कवितासंग्रहाची डेबुजी फाउंडेशन च्या वतीने दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय राष्ट्रसंत श्री गाडगेबाबा साहित्य पुरस्कार २०२६ साठी निवड करण्यात आली आहे. शिर्डी येथे २६ एप्रिल रोजी पार पडणाऱ्या २८ व्या राष्ट्रसंत गाडगे महाराज साहित्य संमेलनात या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल साहित्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी रुचिरा बेटकर यांचे अभिनंदन केले आहे.




बुडतां हे जन न देखवे डोळां ।
येतो कळवळा म्हणउनि ।।

# समतेच्या क्रांतीचा शिल्पकार

१४ एप्रिल हा दिवस केवळ एका महान व्यक्तीचा जन्मदिन नसून, तो भारतीय समाजमनाला जागवणाऱ्या क्रांतिकारी विचारांचा उत्सव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील सामाजिक विषमता, अन्याय आणि मानवी अपमानाविरुद्ध लढा देत एक नवा युगप्रवर्तक इतिहास घडवला. त्यांचे संपूर्ण आयुष्य हे समता, न्याय आणि मानवतेच्या मूल्यांसाठी अखंड संघर्षाचे प्रतीक आहे.

भारतीय समाजातील जातिव्यवस्था ही केवळ सामाजिक रचना नव्हती, तर ती अन्यायाची साखळी होती. दलित समाजाला 'अस्पृश्य' मानून त्यांच्यावर अमानुष बंधने लादली गेली. विहिरीचे पाणी वापरण्याचा हक्क नव्हता, मंदिरात प्रवेश नव्हता, शाळांमध्ये बसण्याची मुभा नव्हती. मानवी प्रतिष्ठेचा पूर्णपणे अभाव होता.

ही स्थिती केवळ आर्थिक नव्हे, तर मानसिक गुलामगिरीची होती. आत्मसन्मान हरवलेला, शिक्षणापासून वंचित आणि संधींपासून दूर ठेवलेला हा समाज अंधारात ढकलला गेला होता.

डॉ. आंबेडकरांनी भारतीय राज्यघटना तयार करताना प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार दिला. कायद्यापुढे सर्व समान, धर्मस्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शिक्षणाचा हक्क-या सर्व मूलभूत अधिकारांनी वंचित समाजाला नवे जीवन दिले.

आरक्षणासारख्या सकारात्मक उपाययोजनांनी (affirmative action) दलित, आदिवासी आणि इतर मागासवर्गीयांना शिक्षण व रोजगाराच्या क्षेत्रात प्रवेश मिळवून दिला. ही केवळ धोरणे नव्हती, तर शतकानुशतकांच्या अन्यायावर दिलेले उत्तर होते.

आज भारतात दलित समाज विविध क्षेत्रांत प्रगती करताना दिसतो. शिक्षण, विज्ञान, प्रशासन, उद्योग आणि राजकारणात त्यांनी स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. सामाजिक जागरूकता वाढली आहे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची ताकद निर्माण झाली आहे.

मात्र, हा बदल सर्वत्र समान प्रमाणात झालेला नाही. शहरांमध्ये प्रगती दिसते, पण ग्रामीण भागात अजूनही जुन्या प्रथा आणि भेदभावाचे सावट दिसते.

डॉ. आंबेडकरांचे कार्य केवळ एका समाजापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी संपूर्ण भारतासाठी लोकशाहीची भक्कम चौकट तयार केली. त्यांनी दिलेले तत्त्व-स्वातंत्र्य, समता आणि बंधुता-हे भारतीय प्रजासत्ताकाचे मूलभूत आधार आहेत.

त्यांनी स्त्री-पुरुष समानता, कामगारांचे हक्क, आर्थिक न्याय यांसाठीही मोलाचे योगदान दिले. त्यांची दूरदृष्टी आणि तत्त्वनिष्ठा आजही भारताच्या प्रगतीचा मार्गदर्शक प्रकाश आहे.

आज भारत आधुनिकतेच्या दिशेने झपाट्याने पुढे जात असला, तरी जातीय भेदभाव, सामाजिक विषमता आणि अन्यायाचे काही स्वरूप अजूनही टिकून आहे. कायदे आहेत, पण त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि समाजाची मानसिकता बदलणे अजूनही मोठे आव्हान आहे.

सोशल मीडियाच्या युगात जागरूकता वाढली आहे, पण त्याचबरोबर द्वेष आणि विभाजन पसरवणाऱ्या प्रवृत्त्याही वाढताना दिसतात.

आजच्या काळात काही लोक बाबासाहेबांचे नाव घेतात, पण त्यांच्या विचारांचे पालन करत नाहीत. त्यांच्या कार्याचा उपयोग केवळ राजकीय फायद्यासाठी केला जातो. त्यांच्या मूलभूत तत्त्वांचा विसर पडत चालला आहे. हे विस्मरण केवळ एका महान व्यक्तीचा अपमान नाही, तर समाजाच्या प्रगतीसाठी धोकादायक आहे.

जर समाजाने बाबासाहेबांचे विचार आत्मसात केले नाहीत, तर विषमता आणि अन्याय पुन्हा डोके वर काढू शकतात. शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक एकता यांना प्राधान्य दिले नाही, तर प्रगतीचा वेग मंदावेल.

भविष्यातील भारत हा समतेचा, न्यायाचा आणि मानवतेचा आदर्श देश व्हावा, यासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ इतिहासातील एक महान व्यक्तिमत्त्व नाहीत, तर ते जिवंत विचारधारा आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त केवळ अभिवादन करून थांबणे अपुरे आहे. त्यांच्या विचारांचे आचरण करणे, अन्यायाविरुद्ध उभे राहणे आणि समतेसाठी कार्य करणे-हाच त्यांना खरा आदर आहे.

शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा त्यांचा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे. हा संदेश केवळ ऐकण्यासाठी नाही, तर जगण्यासाठी आहे



# मानवतावादी नेते: डॉ.बाबासाहेब आंबेडकर

प्रा.डॉ.बालाजी पोतुलवार
९८२३४४४१०७

आज देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यापक कर्तृत्व मर्यादित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यांना केवळ एका समाजाचे नेते म्हणून ओळख देण्याची एक सूक्ष्म आणि सातत्याने चालणारी प्रवृत्ती दिसते. प्रत्यक्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे कैवारी किंवा एका घटकाचे प्रतिनिधी नव्हते; ते या देशातील सर्व प्रश्नांशी, सर्व चळवळींशी, सर्व आंदोलनांशी आणि सर्व समाजाशी एकरूप झालेले महान नेते होते. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय आणि धार्मिक अशा विविध पातळ्यांवरील गुंतागुंतीच्या समस्यांचा वेध घेऊन त्यावर उपाय सुचविणारा विचारवंत म्हणून त्यांचे स्थान अद्वितीय आहे. त्यांनी दलितांच्या उत्थानासाठी कार्य केलेच; पण तेथेच न थांबता या देशातील शोषित, पीडित आणि वंचित घटकांसह एकूण भारताच्या पुनर्रचनेचा विचार आयुष्यभर केला.

भारताचे एकात्म स्वरूप निर्माण करण्यासंबंधी संविधान सभेत बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते: मी हे जाणतो की, आज आपण राजकीय, आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या विभाजित आहोत. आपण युद्धस्त प्रतिस्पर्धी गटांत विभागलेलो आहोत आणि मी कदाचित अशाच एका प्रतिस्पर्धी गटाचा नेता आहे; परंतु महोदय, हे सर्व असूनही परिस्थिती अनुकूल झाली तर या जगातील कोणतीही शक्ती या देशाला एकात्म होण्यापासून प्रतिबंधित करू शकणार नाही. या विधानात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा मूलस्वर दडलेला आहे. समाजातील ताणतणावांची त्यांना पूर्ण जाणीव होती; पण त्याहून अधिक दृढ विश्वास त्यांना मानवाच्या एकात्मतेवर होता. म्हणूनच त्यांना एका जातीत किंवा एका घटकात सीमित करणे म्हणजे त्यांच्या विचारांचे संकुचन होय.

भारतीय राज्यघटना ही केवळ राजकीय सत्तेची रचना करणारा दस्तऐवज नाही; ती मानवमुक्तीची सामाजिक संहिता आहे. डॉ. आंबेडकरांनी लोकशाहीचा अर्थ केवळ निवडणुकांपुरता मर्यादित मानला नाही. त्यांच्या दृष्टीने लोकशाही ही जीवनपद्धती होती. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, राजकीय लोकशाही टिकायची असेल तर सामाजिक लोकशाही आवश्यक आहे. ही सामाजिक लोकशाही तीन मूलभूत तत्त्वांवर उभी राहते : स्वातंत्र्य, समता आणि बंधुता. स्वातंत्र्य व्यक्तीला उभे राहण्याची शक्ती देते, समता त्याला मानवी प्रतिष्ठा देते आणि बंधुता समाजाला एकात्मतेची नैतिक जाणीव देते. बंधुतेशिवाय समता टिकत नाही आणि समतेशिवाय स्वातंत्र्य निरर्थक ठरते, ही त्यांची ठाम धारणा होती.

बाबासाहेब म्हणजे केवळ घटनेचे शिल्पकार एवढेच सीमित करणे म्हणजे देशाचे मोठे नुकसान होय. महात्मा ज्योतिराव फुले आणि राजर्षी शाहू महाराज अशा महामानवांना जसे जातीत बंदिस्त करण्याचे प्रयत्न झाले, तसेच प्रयत्न बाबासाहेबांबाबतही होताना दिसतात. समाजातील शोषणामागील एक महत्त्वाचे कारण म्हणजे विविध घटकांनी स्वतःभोवती उभारलेले जातीय अहंकाराचे कवच होय. शेतकरी, आदिवासी, श्रमिक कामगार, विमुक्त भटके, स्त्रिया, शेतमजूर व इतर मागास घटकही अनेकदा आपल्या मर्यादित जातीय ओळखीत अडकून व्यापक सामाजिक परिवर्तनाच्या विचारापासून दूर राहतात. परिणामी सम्यक परिवर्तनाची प्रक्रिया अपुरी राहते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेला विचार हा केवळ एखाद्या घटकाच्या हक्कांसाठीचा संघर्ष नव्हता; तो मानवी प्रतिष्ठेचा संघर्ष होता. म्हणूनच त्यांच्या कार्याचा लाभ सर्व समाजघटकांना झाला. परंतु श्रेय मात्र मर्यादित चौकटीत अडकले. महापुरुषांच्या विचारांना जातीच्या सीमांत बंदिस्त केले की समाज स्वतःच आपली प्रगती रोखतो. जातीय अहंकार गरीब माणसाच्या विकासाच्या विरोधात उभा राहतो आणि मानवतेच्या बंधनांना तोडतो. म्हणूनच सर्व शोषित, पीडित आणि वंचित घटकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समजून घेणे, त्यांना स्वीकारणे आणि त्यांच्या विचारांना जीवनमूल्य म्हणून अंगीकारणे ही काळाची गरज आहे.

कुठल्याही देशातील महापुरुषांनी समाजासाठी केलेल्या कार्याचा लाभ अखेरीस संपूर्ण समाज घेत असतो; परंतु त्यांचे विचार मात्र विभागले जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बाबतीतही हेच घडले. त्यांना केवळ दलितांचे कैवारी म्हणून मर्यादित केल्याने त्यांच्या कार्याचा खरा आवाका दुर्लक्षित झाला. प्रत्यक्षात त्यांनी आदिवासी, कामगार, शेतकरी, स्त्रिया आणि शतकानुशतके शोषित असलेल्या सर्व घटकांच्या बाजूने उभे राहून अनेक संघर्ष केले. शिक्षणापासून दूर असलेल्या आदिवासी समाजाच्या कल्याणासाठी भारतीय राज्यघटनेतील कलम १५, १६, १९, ४६, १६४, २७५, ३३०, ३३८(क), ३३९(१), ३३९(२), ३४२(१), ३४२(२), २४४, २४४(क) अशा तरतुदी करण्यात आल्या. या तरतुदींमुळे आदिवासी समाजाला सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक संरक्षण मिळाले, हे विशेष नमूद करावे लागेल.

आज या देशातील सामाजिक वास्तव समजून घ्यायचे असेल, तर जातव्यवस्थेचा विचार टाळता येत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील असमानतेची मुळे केवळ आर्थिक विषमतेत शोधली नाहीत; त्यांनी ती सामाजिक रचनेत, विशेषतः जातव्यवस्थेत शोधली. त्यांच्या मते जात ही केवळ सामाजिक विभागणी नव्हे, तर मानवी व्यक्तिमत्त्वावर लादलेली कायमस्वरूपी मर्यादा आहे. जन्मावर आधारित स्थान ठरविणारी ही व्यवस्था व्यक्तीच्या कर्तृत्वाला, स्वातंत्र्याला आणि प्रतिष्ठेला नाकारते. म्हणूनच त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, जात आणि लोकशाही एकत्र नांदू शकत नाहीत. समाजातील अनेक प्रश्न : अस्पृश्यता, अन्याय, शोषण, शिक्षणापासून वंचितता, आर्थिक दारिद्र्य, हे केवळ योगायोगाने निर्माण झालेले नाहीत; ते एका विशिष्ट सामाजिक व्यवस्थेचे परिणाम आहेत, असे ते मानत. त्यांच्या प्रसिद्ध विचारांनुसार, राजकीय स्वातंत्र्य मिळाले तरी सामाजिक गुलामगिरी कायम असेल तर स्वातंत्र्य अपूर्ण राहते. म्हणूनच त्यांनी जातिनाश हा सामाजिक परिवर्तनाचा केंद्रबिंदू मांडला. जातिनाश म्हणजे कोणत्याही एका जातीचे वर्चस्व संपविणे नव्हे, तर माणसाला माणूस म्हणून स्वीकारणारी नवी सामाजिक नैतिकता निर्माण करणे होय.

महात्मा फुले आणि राजर्षी शाहू महाराजांनी सुरू केलेल्या सामाजिक समतेच्या परंपरेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वैचारिक अधिष्ठान दिले. त्यांनी केवळ सुधारणा सुचवल्या नाहीत, तर समाजाच्या विचारपद्धतीलाच आव्हान दिले. समाजातील जातीय अहंकारामुळे माणूस व्यापक मानवतेपासून दूर जातो, हे त्यांनी वारंवार अधोरेखित केले. म्हणूनच ते म्हणत की, समाजातील वेगवेगळे घटक आपल्या मर्यादित जातीय ओळखीपलीकडे गेले नाहीत, तर खरे राष्ट्रीय ऐक्य निर्माण होणार नाही. आज सर्वसामान्य लोकांचे जे शोषण होताना दिसते, त्यामागे केवळ आर्थिक कारणे नाहीत; सामाजिक मानसिकताही तितकीच कारणीभूत आहे. शेतकरी, आदिवासी, श्रमिक कामगार, विमुक्त भटके, शेतमजूर, स्त्रिया आणि इतर मागास घटक हे अनेकदा एकमेकांपासून विभक्त राहतात. ही विभागणी बाह्य शक्तींपेक्षा अंतर्गत मानसिकतेतून अधिक दृढ होते. प्रत्येक घटक आपली जातीय ओळख जपण्यात गुंततो आणि व्यापक परिवर्तनाचा विचार मागे पडतो. परिणामी अन्यायाविरुद्ध सामूहिक प्रतिकार उभा राहत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला सम्यक परिवर्तनाचा विचार समजून न घेता त्यांना केवळ एका समाजाचे नेते मानणे म्हणजे त्यांच्या कार्याचे अवमूल्यन होय. त्यांनी मांडलेली लोकशाही ही केवळ शासनपद्धती नव्हती; ती नैतिक समाजव्यवस्था होती. त्यांच्या दृष्टीने बंधुता हा लोकशाहीचा आत्मा होता. बंधुता म्हणजे परस्परांचा मानवी स्वीकार. जेथे माणूस माणसाला समान मानत नाही, तेथे कायदे टिकत नाहीत आणि समताही रुजत नाही. म्हणूनच त्यांनी सामाजिक परिवर्तनाला नैतिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला. महापुरुषांना जातीच्या चौकटीत बंदिस्त केले की समाज स्वतःचीच हानी करतो. बाबासाहेबांना केवळ दलितांचे नेते म्हणणे म्हणजे त्यांच्या विचारांचा विस्तार नाकारण्यासारखे आहे. त्यांनी उभा केलेला संघर्ष हा कोणत्याही एका वर्गापुरता मर्यादित नव्हता; तो मानवी प्रतिष्ठेच्या पुनर्स्थापनेसाठी होता. जातीय अहंकार गरीब माणसाच्या उन्नतीच्या विरोधात उभा राहतो आणि समाजातील नैसर्गिक ऐक्याला तडा देतो. म्हणूनच सर्व शोषित, पीडित आणि वंचित घटकांनी जातीय मर्यादा ओलांडून त्यांच्या विचारांना स्वीकारणे आवश्यक आहे. समाजातील जातीयतेमुळे निर्माण होणारी मानसिक गुलामगिरी ही बाह्य गुलामगिरीपेक्षा अधिक घातक आहे. बाह्य गुलामगिरी माणसाचे शरीर जखडते; पण मानसिक गुलामगिरी त्याची विचारशक्ती हरवते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या मानसिक गुलामगिरीवर प्रहार केला. त्यांनी लोकांना आत्मसन्मानाची जाणीव करून दिली आणि स्वाभिमानाचा अधिकार दिला. त्यामुळेच त्यांचा संघर्ष हा केवळ राजकीय नव्हता, तर सांस्कृतिक आणि नैतिकही होता.

आज आपण सर्व जाणतो की, या देशात ७० टक्क्यांपेक्षा अधिक समाज शेतीवर अवलंबून आहे. ही बाब लक्षात घेऊन शेती, शेतकरी आणि शेतीशी संबंधित समूहाचा गंभीरपणे विचार सोळाव्या शतकापासून छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा महापुरुषांनी व त्यांच्या चळवळींनी केला. सावकारी कर्ज, प्रस्थापित व्यवस्था व सरकारी यंत्रणा यांनी इथल्या शेतकऱ्यांचे जगणे कठीण केले होते. अशा अवस्थेत महात्मा ज्योतिराव फुले यांनी शेतकऱ्यांच्या स्थितीचे विश्लेषण करून त्यांच्या उत्थानाचे मार्ग सुचविले. पुढे शेतीसाठीची भांडवली गुंतवणूक, आधुनिक सुविधा आणि शेतकऱ्यांच्या हक्कांचा प्रश्न या सर्वांचा अभ्यास करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक चळवळी उभ्या केल्या. विशेषतः कोकण प्रांत शेतकरी संघाचे मार्गदर्शक नेते म्हणून त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली. कोकणात खोत पद्धती अस्तित्वात होती. (ब्राह्मण, मारवाडी, मुसलमान, गुजराती समाजातील वजनदार लोक म्हणजे खोत) यांनी शेती कसणाऱ्या कुळांना जेरीस आणले होते. कुळांना एकूण उत्पन्नापैकी केवळ ४० टक्के हिस्सा मिळत होता. त्यात सावकारी कर्ज किंवा दुष्काळ असेल तर शेतकऱ्यांच्या हातात काहीच उरत नव्हते. अशा स्थितीत बाबासाहेबांनी शेतकऱ्यांच्या चळवळीचे नेतृत्व केले. खोती पद्धतीविरुद्ध रायगड व रत्नागिरी जिल्ह्यात अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांच्या सभा झाल्या. या सभांमधून सर्वसामान्य शेतकरी डॉ. बाबासाहेबांच्या भाषणाने प्रभावित झाला आणि शोषणाविरुद्ध उभा राहिला. सावकारांच्या जमिनी कसायच्या नाहीत म्हणून १९३३ ते १९३९ अशी सात वर्षे शेतकऱ्यांनी संप घडवून आणला. हा जगातील प्रदीर्घ संप मानला जातो. यात नारायण नागू पाटील, सुरबा नाना टिपणीस, भाई चित्रे व सी. के. बेले यांचे परिश्रम मोलाचे होते. या आंदोलनाच्या परिणामातून १७ सप्टेंबर १९३७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खोती पद्धती नष्ट करण्याचे विधेयक मुंबई विधिमंडळात मांडले. त्यानंतर १९४८ साली जमीन महसूल संहिता बदलून खोती निर्मूलन अधिनियम १५ मे १९५० पासून लागू करण्यात आला. कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ नुसार कसेल त्याची जमीन हे तत्त्व लागू करण्यात आले.

शेतीविषयक प्रश्नांचा विचार करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ तात्कालिक समस्यांकडे पाहिले नाही; त्यांनी आर्थिक रचनेचाही विचार केला. त्यांच्या मते राजकीय लोकशाही टिकण्यासाठी आर्थिक लोकशाही आवश्यक आहे. उत्पादनाची साधने काहींच्याच हातात केंद्रीत राहिली तर सामाजिक समता शक्य नाही. म्हणूनच त्यांनी नियोजनबद्ध अर्थव्यवस्था, औद्योगिकीकरण आणि राज्याची सामाजिक जबाबदारी यांवर भर दिला. शेतीसाठी पाणी, वीज आणि सिंचन नियोजन ही केवळ तांत्रिक बाब नसून सामाजिक न्यायाची अट आहे, असे ते मानत. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीत जलधोरणाच्या तरतुदींवर त्यांनी दिलेला भर याच दृष्टीकोनातून होता. देशाचे महत्त्वाचे उत्पादनस्रोत शेती असल्याने 'शेतीसाठी पाणी' ही मूलभूत गरज त्यांनी राष्ट्रीय प्रश्न मानली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य केवळ शेतकऱ्यांपुरते मर्यादित राहिले नाही. त्यांनी कामगारांना संघटित करून त्यांच्या हक्कांसाठी संघर्ष उभा केला. १९४२ ते १९४६ या काळात ब्रिटिश सरकारच्या व्हाइसरॉयने त्यांची मजूरमंत्री म्हणून नियुक्ती केली. या काळात त्यांनी कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करणारे अनेक कायदे केले. योग्य वेतन, कामाचे नियमन, स्त्रियांना प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतर भरपगारी रजा, बोनस, पेन्शन, कामगारांसाठी विमा आणि निवासाची सोय यांसारख्या अनेक निर्णयांनी कामगारांच्या जीवनमानात बदल घडविला. ४०० फूट खोल खाणीत काम करणाऱ्या स्त्री कामगारांच्या प्रश्नांवर त्यांनी विशेष लक्ष दिले. त्यामुळे ते केवळ एका घटकाचे नव्हे तर कामगारवर्गाचेही महान नेते ठरतात.

स्त्रीला माणूस म्हणून मान-सन्मान मिळावा, ही त्यांची स्पष्ट भूमिका होती. म्हणूनच त्यांनी स्त्रीला संपत्तीवरील हक्क, विवाहातील समान स्थान, घटस्फोटाचा अधिकार आणि स्वतंत्र कायदेशीर व्यक्तिमत्त्व मिळावे यासाठी सातत्याने प्रयत्न केले. स्त्री ही केवळ घरापुरती मर्यादित नसून कुटुंबनिर्णयात सहभागी होणारी आणि समाजजीवनाची सक्रिय घटक आहे, हे त्यांनी ठामपणे मांडले. त्यांच्या दृष्टीने स्त्री-समानता ही केवळ स्त्रियांचा प्रश्न नव्हता; ती लोकशाहीची मूलभूत अट होती. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही तत्त्वे स्त्रीपुरुष दोघांसाठी समान असली पाहिजेत. समाजात पुरुषाला स्वातंत्र्य आणि स्त्रीला बंधन असेल, तर लोकशाहीचा पाया दुर्बल राहतो. म्हणूनच स्त्रीच्या अधिकारांचा प्रश्न त्यांनी मानवी अधिकारांच्या चौकटीत मांडला. स्त्रीला समान नागरिक म्हणून स्वीकारल्याशिवाय सामाजिक लोकशाही शक्य नाही, हा त्यांचा ठाम विश्वास होता.

स्त्री-समानतेच्या या वैचारिक भूमिकेचा प्रत्यक्ष आविष्कार हिंदू कोड बिलाच्या प्रयत्नांतून दिसून येतो. ११ एप्रिल १९४७ रोजी संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'हिंदू कोड बिल' मांडले. हे केवळ कायद्याचे विधेयक नव्हते; ते भारतीय कुटुंबसंस्थेच्या पुनर्रचनेचे धाडसी पाऊल होते. विवाह, वारसा, दत्तक, संपत्ती आणि कौटुंबिक संबंध यांमध्ये स्त्रीला स्वतंत्र व्यक्ती म्हणून कायदेशीर मान्यता देण्याचा हा पहिलाच व्यापक प्रयत्न होता. त्या काळापर्यंत स्त्रीचे स्थान मुख्यतः पती, पिता किंवा कुटुंबाच्या अधीन मानले जात होते. वारसाहक्क मर्यादित, विवाहातील अधिकार असमान आणि घटस्फोटाची तर कल्पनाही अमान्य अशी परिस्थिती होती. या सर्व स्थितीत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न हिंदू कोड बिलातून करण्यात आला. परंतु या विधेयकाला प्रचंड विरोध झाला. सामाजिक परंपरा, धार्मिक रूढी आणि राजकीय संकोच या सर्वांनी मिळून या बिलाला अडथळे निर्माण केले. अनेकांना वाटत होते की कुटुंबसंस्थेत बदल झाला तर सामाजिक रचना ढासळेल. प्रत्यक्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे म्हणणे वेगळे होते. त्यांच्या दृष्टीने अन्यायावर उभी असलेली व्यवस्था टिकवणे हीच समाजासाठी घातक बाब होती. स्त्रीला वारसाहक्क, संपत्तीवरील हक्क आणि विवाहातील समान स्थान देणे म्हणजे कुटुंबसंस्था मोडणे नव्हे, तर तिला नैतिक आधार देणे होय. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, ज्या समाजात स्त्रीला न्याय मिळत नाही, तो समाज सभ्यतेचा दावा करू शकत नाही.

२७ सप्टेंबर १९५१ पर्यंत हे विधेयक मान्य झाले नाही. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला. हा राजीनामा केवळ राजकीय निर्णय नव्हता; तो तत्त्वनिष्ठ भूमिकेचा उच्चांक होता. सत्तेपेक्षा तत्त्वांना प्राधान्य देण्याची त्यांची वृत्ती यातून दिसून येते. स्त्रियांच्या अधिकारांबाबत तडजोड करणे त्यांना मान्य नव्हते. त्यांच्या मते, लोकशाही ही केवळ शासनव्यवस्था नसून समाजातील दुर्बल घटकांना न्याय देण्याची पद्धती आहे. त्यामुळे स्त्री-समानता हा प्रश्न पुढे ढकलणे म्हणजे लोकशाहीच्या आत्म्यालाच नाकारणे होय. या विधेयकाला विरोध केवळ राजकीय नेत्यांकडूनच झाला असे नव्हते; अनेक स्त्रियाही त्याच्या विरोधात उभ्या राहिल्या. त्यामागे माहितीचा अभाव आणि सामाजिक दबाव ही दोन प्रमुख कारणे होती. स्त्रियांना या बिलाच्या तरतुदींची पूर्ण जाणीव नव्हती, तसेच कुटुंबीयांकडून निर्माण होणारी भीतीही मोठी होती. तरीही या प्रयत्नामुळे भारतीय समाजात स्त्री-अधिकारांचा प्रश्न व्यापक चर्चेत आला. पुढील काळात करण्यात आलेल्या कायद्यांना याच विचारांची प्रेरणा मिळाली. म्हणूनच हिंदू कोड बिल हा केवळ अपूर्ण राहिलेला कायदा नसून भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरतो.

समाजातील समानतेचा प्रश्न केवळ एका घटकापुरता मर्यादित नसून व्यापक सामाजिक रचनेशी संबंधित आहे, हे त्यांच्या या भूमिकेतून स्पष्ट होते. मात्र या तरतुदींची अंमलबजावणी दीर्घकाळ झाली नाही. मागास वर्गांच्या प्रश्नांकडे गंभीरपणे पाहिले जात नाही, ही बाब त्यांना अस्वस्थ करणारी होती. २७ सप्टेंबर १९५१ रोजी त्यांनी कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला, त्यामागे हिंदू कोड बिलासोबतच मागास वर्गांसाठी आयोग नेमण्यात होणारा विलंब हेही एक महत्त्वाचे कारण होते. सत्तेच्या स्थानावर राहूनही आपल्या तत्त्वांशी तडजोड न करण्याची त्यांची वृत्ती यातून दिसते. हा राजीनामा केवळ राजकीय मतभेद नव्हता; तो सामाजिक न्यायासाठी दिलेला नैतिक संदेश होता. सत्तेपेक्षा न्याय मोठा आहे, ही त्यांची धारणा यातून स्पष्ट होते. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना केवळ एका समाजाचे नेते मानणे योग्य ठरत नाही; त्यांनी समाजातील सर्व वंचित घटकांच्या हक्कांसाठी समानपणे संघर्ष केला.

या व्यापक सामाजिक विचारांचा नैसर्गिक परिपाक त्यांच्या बौद्ध धम्म स्वीकारण्यात दिसून येतो. त्यांनी धर्मांतराचा निर्णय आध्यात्मिक पलायन म्हणून घेतला नव्हता; तो नैतिक समाजव्यवस्थेचा स्वीकार होता. त्यांना जाणवले की सामाजिक परिवर्तन केवळ कायद्याने होत नाही; त्यासाठी नैतिक मूल्यांची गरज असते. बौद्ध धम्मातील करुणा, प्रज्ञा आणि समता या मूल्यांमध्ये त्यांना मानवी समाजाचे आदर्श तत्त्वज्ञान दिसले. बौद्ध धम्म व्यक्तीला विचारस्वातंत्र्य देतो, नैतिक जबाबदारी शिकवतो आणि माणसामाणसांतील समानतेवर आधारलेला आहे. धर्म माणसासाठी असतो, माणूस धर्मासाठी नव्हे, ही त्यांची धारणा होती. म्हणूनच त्यांनी समाजाला नैतिक अधिष्ठान देण्यासाठी बौद्ध धम्माचा स्वीकार केला. हा निर्णय त्यांच्या मानवतावादी विचारांचा परिपाक होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य एका घटकापुरते मर्यादित नाही. शेतकरी, कामगार, स्त्रिया, आदिवासी, मागासवर्गीय आणि सर्व वंचित घटकांच्या प्रश्नांशी ते एकरूप झाले. त्यांनी दिलेली राज्यघटना, मांडलेले सामाजिक विचार, शिक्षणाचा संदेश आणि नैतिकतेवर आधारित धर्मदृष्टी या सर्वांचा केंद्रबिंदू मानवमुक्ती हाच होता. म्हणूनच त्यांना केवळ एका समाजाचे नेते म्हणणे त्यांच्या कार्याचा अपमान ठरतो. जातीय मानसिकतेच्या चौकटीबाहेर जाऊन त्यांच्या विचारांना स्वीकारले, तरच लोकशाहीचे खरे स्वरूप प्रकट होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ घटनेचे शिल्पकार नव्हते; ते समाजमन घडविणारे विचारवंत होते. त्यांनी दिलेली स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये आजही भारतीय समाजाच्या प्रगतीची दिशा ठरवतात. समाजाने त्यांना एका समाजापुरते मर्यादित न ठेवता सर्वांचे मानवतावादी नेते म्हणून समजून घेतले, तरच त्यांच्या कार्याला खरी अभिवंदना ठरेल.

(मराठी विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड)

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची शैक्षणिक वाटचाल



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ नाव भीमराव होते. त्यांचे वडील श्री रामजी वल्द मालोजी सकपाळ हे महू येथेच मेजर सुभेदार पदावरील लष्करी अधिकारी होते. त्यांनी आणि त्यांची पत्नी भीमाबाई यांनी त्यांच्या सेवेची शेवटची वर्षे काली पलटण येथील जन्मस्थान स्मारकाच्या जागेवर असलेल्या बॅरेकमध्ये घालवली. १८९१ मध्ये १४ एप्रिल रोजी रामजी सुभेदार कर्तव्यावर असताना रात्री १२ वाजता भीमरावांचा जन्म झाला. मुलाचा प्रारंभिक काळ कबीर पंथी वडील आणि धार्मिक आईच्या कुशीत शिस्तबद्ध होता.

बालक भीमराव यांचे प्राथमिक शिक्षण दापोली व सातारा येथे झाले. १९०७ मध्ये त्यांनी मुंबईतील एल्फिन्स्टन स्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. यावेळी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला व भेट म्हणून त्यांचे शिक्षक श्री कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांनी त्यांना 'बुद्ध चरित्र' हा स्वलिखित ग्रंथ भेट म्हणून दिला. भीमरावांनी बडोदाचे राजे सयाजीराव गायकवाड यांच्याकडून फेलोशिप मिळाल्यानंतर १९१२ मध्ये मुंबई विद्यापीठातून पदवी उत्तीर्ण केली. संस्कृत शिकण्यास मनाई असल्याने ते फारसी घेऊन उत्तीर्ण झाले. बी.ए नंतर एम.ए अध्ययन हेतू बडोदा नरेश सयाजी गायकवाड यांची पुन्हा फेलोशिप मिळाल्यानंतर त्यांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात शिक्षणासाठी प्रवेश घेतला. १९१५ मध्ये त्यांनी पदव्युत्तर पदवीची परीक्षा उत्तीर्ण केली. त्यासाठी त्यांनी 'कॉमर्स ऑफ एन्शेंट इंडिया' हा प्रबंध लिहिला. त्यानंतर १९१६ मध्ये अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी पीएच.डी. उपाधी प्राप्त केली. 'ब्रिटिश भारतातील प्रांतीय वित्ताचे विकेंद्रीकरण' हा संशोधनाचा विषय होता.

फेलोशिप पूर्ण केल्यानंतर त्यांना भारतात परतावे लागले, त्यामुळे ते ब्रिटनमार्गे परतत होते. तिथल्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्समध्ये त्यांनी एम.एससी. आणि डी.एससी आणि लॉ इन्स्टिट्यूटमध्ये बार-एट-लॉ पदवीसाठी नोंदणी केली आणि भारतात परतले. सर्वप्रथम शिष्यवृत्तीच्या अटीनुसार त्यांनी बडोद्याच्या राजाच्या दरबारात लष्करी अधिकारी आणि आर्थिक सल्लागार ही जबाबदारी स्वीकारली. संपूर्ण शहरात कोणीही त्याला कामावर घेण्यास तयार नसल्याच्या गंभीर समस्येमुळे तो काही काळानंतर मुंबईत परत आले.

परळ येथे डबक चाळ आणि कामगार वसाहतीत अर्धवेळ अध्यापन आणि वकिली करून अपूर्ण अभ्यास पूर्ण करण्यासाठी तेथे राहत होते आणि पत्नी रमाबाई यांच्यासोबत राहत होते. १९१९ मध्ये डॉ. आंबेडकरांनी राजकीय सुधारणांसाठी स्थापन केलेल्या साऊथबरो कमिशनसमोर राजकारणात दलित प्रतिनिधित्वाच्या बाजूने पुरावे दिले. अशिक्षित आणि गरीब लोकांना जागरूक करण्यासाठी त्यांनी मूकनायक आणि बहिष्कृत इंडिया या साप्ताहिकांचे संपादन करून मूक आणि अशिक्षित आणि गरीब लोकांना जागरुक केले आणि आपले अपूर्ण अभ्यास पूर्ण करण्यासाठी ते लंडन आणि जर्मनी येथे गेले आणि तेथून एम.एससी., डी.एससी., आणि बॅरिस्टर पदव्या प्राप्त केल्या. त्यांच्या M.Sc. चे संशोधनाचे विषय होते इम्पीरियल फायनान्सच्या प्राप्य विकेंद्रीकरणाचा विश्लेषणात्मक अभ्यास आणि त्यांच्या D.Sc. पदवीचा विषय रुपयाची समस्या, त्याची उत्पत्ती आणि उपाय आणि भारतीय परिसंचरण आणि बँकिंगचा इतिहास होता.

# समतेच्या विचारांचा आधुनिक प्रवास

## जगतज्योती महात्मा बसवेश्वर व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतील नवा भारत



१४ एप्रिल हा दिवस आपल्या राष्ट्रासाठी केवळ स्मरणाचा नाही तर आत्मपरीक्षण आणि नव्याने संकल्प करण्याचा दिवस आहे. महामानव ज्ञानाचा अथांग महासागर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आणि कार्याला अभिवादन करतो पण त्याही पलीकडे जाऊन त्यांच्या विचारांचा अर्थ आपल्या सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनात पुन्हा एकदा समजून घेण्याचा प्रयत्न करतो.

मानवी प्रतिष्ठा ही अबाधित आहे, समानता ही न्यायाची पायाभूत अट आहे आणि बंधुता हा लोकशाहीचा आत्मा आहे ह्या ज्या विचारांची मांडणी भारतरत्न डॉ. आंबेडकरांनी केली तीच विचारधारा आपल्याला जगत् ज्योती संत महात्मा बसवेश्वरांच्या शिकवणीतही तितक्याच प्रभावीपणे आढळते. या दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांकडे पाहताना एक अखंड, कालातीत विचारप्रवाह दिसतो तो म्हणजे समता, करुणा आणि सामाजिक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या मूलभूत आणि अधिकृत लेखनात महात्मा बसवेश्वरांविषयी विस्तृतपणे स्पष्ट उल्लेख केलेला आढळत नाही. तथापि, त्यांनी समाजातील जातीय विषमता आणि श्रेणीभेदाला आव्हान देणाऱ्या पूर्वकालीन संत आणि समाजसुधारकांच्या परंपरेचा सातत्याने गौरव केला आहे. या व्यापक समतावादी विचारपरंपरेत, बाराव्या शतकातील बसवेश्वरांचा आंदोलन हा समानता, मानवी प्रतिष्ठा आणि बंधुता या मूल्यांचा एक प्रभावी ।शिषशीशपलश म्हणून अनेक अभ्यासकांकडून पाहिला जातो हीच मूल्ये पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संस्थात्मक स्वरूपात स्थापित केली. बसवेश्वरांनी आध्यात्मिक सामाजिक सुधारणा चळवळीची सुरुवात केली तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या मूल्यांना पुढे नेऊन त्यांना कायदेशीर, घटनात्मक आणि लोकशाही स्वरूपात संस्थात्मक रूप दिले.

राज्यसभेचा सदस्य म्हणून विविधतेने नटलेल्या समाजाचे प्रतिनिधित्व करताना या मूल्यांची जाणीव अधिक तीव्रतेने होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवलेल्या संविधानाने आपल्याला दिशा दिली आहे पण त्या तत्त्वांना जीवनात उतरवण्याची जबाबदारी आपली आहे. शासन म्हणजे केवळ कारभार नाही तर न्यायाची अंमलबजावणी आहे. नेतृत्व म्हणजे अधिकार नव्हे तर सेवा आहे आणि प्रगती म्हणजे केवळ आर्थिक वाढ नव्हे तर सर्वांच्या उन्नतीची प्रक्रिया आहे.

हा विचारप्रवाह कोणत्याही एका समाजापुरता मर्यादित नाही. तो सार्वत्रिक आहे. आजच्या जगात वाढत्या विभाजनाच्या पार्श्वभूमीवर समता आणि बंधुत्वाचा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. तो आपल्याला संकुचित ओळखींपलीकडे जाऊन व्यापक मानवतेकडे पाहण्यास प्रेरित करतो. महात्मा बसवेश्वरांची नैतिक शिकवण या प्रवासात मार्गदर्शक ठरते.

परिवर्तनाचा. या विचारप्रवाहाचा केंद्रबिंदू म्हणजे प्रत्येक माणूस समान आहे ही अढळ श्रद्धा.

महात्मा बसवेश्वरांनी ज्या काळात आपले विचार मांडले, त्या काळात समाज कठोर जातिव्यवस्थेच्या चौकटीत अडकलेला होता. तरीही त्यांनी आपल्या वचनांमधून स्पष्टपणे सांगितले की माणसाचे श्रेष्ठत्व त्याच्या जन्मावर नव्हे तर त्याच्या आचरणावर अवलंबून आहे. श्रमाला त्यांनी पूजेसमान स्थान दिले आणि ईश्वरप्राप्तीचा मार्ग सर्वांसाठी खुला असल्याचे प्रतिपादन केले. शतकांनंतर महामानव डॉ. बाबासाहेबांना ज्या सामाजिक वास्तवाला सामोरे जावे लागले तेही याच विषमतेने ग्रासलेले होते. त्यांनी या अन्यायाला केवळ विरोधच केला नाही तर आधुनिक लोकशाही व्यवस्थेमध्ये त्यावर उपायही सुचवला. त्यांच्या संविधाननिर्मितीतून समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांना संस्थात्मक स्वरूप प्राप्त झाले.

जगत् ज्योती म. बसवेश्वरांच्या वचनांमध्ये आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमध्ये एक अद्भुत सुसंवाद दिसून येतो. जरी भाषेचा आणि अभिव्यक्तीचा भिन्नपणा दिसत असला तरी कारण एकीकडे भक्तिपूर्ण आणि काव्यात्मक शैली आहे तर दुसरीकडे तर्कशुद्ध आणि कायदेशीर मांडणी तरीही या दोघांचे ध्येय एकच आहे. जातिव्यवस्थेचा ठाम विरोध, मानवी सन्मानाची स्थापना आणि परस्पर आदरावर आधारित समाजरचना ही दोघांचीही मूलभूत भूमिका आहे.

म. बसवेश्वरांचे अनुभवमंटप हे जणू आध्यात्मिक लोकशाहीचे पहिले व्यासपीठ होते जिथे सर्वांना समानतेने आपले विचार मांडण्याची संधी होती. त्याच धर्तीवर डॉ. आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाला समान हक्क आणि संधी देणारी व्यवस्था निर्माण केली. ही केवळ तात्त्विक समानता नाही तर ती आजही लाखो लोकांच्या जीवनात जिवंत आहे. बसवेश्वरांच्या शिकवणीवर आधारलेली लिंगायत परंपरा सामाजिक आणि आध्यात्मिक समतेचा पुरस्कार करते. हीच भावना डॉ. आंबेडकरांच्या शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीतून अधिक बळकट होते.शिक्षणाला त्यांनी मुक्तीचे साधन मानले आणि बसवेश्वरांनीही ज्ञानाला आत्मोन्नतीचा मार्ग मानले. दोघांच्याही दृष्टीने अज्ञान हे अन्याय टिकवून ठेवणारे आहे तर ज्ञान हे केवळ बौद्धिक नसून नैतिक जागृतीचे साधन आहे.

आजच्या भारतात जिथे आर्थिक प्रगतीसोबत सामाजिक विषमता अजूनही अस्तित्वात आहे, तिथे या संयुक्त वारशाचे महत्त्व अधिक दिसून येते कारण समानता ही केवळ कायदेशीर असून चालणार नाही तर ती सामाजिक आणि मानसिक पातळीवरही असायला हवी तरच समाजात परिवर्तन घडू शकते . डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले होते की

**डॉ.अजित माधवराव गोपछडे**
खासदार, राज्यसभा

सामाजिक लोकशाहीशिवाय राजकीय लोकशाही टिकू शकत नाही. समतेची संकल्पना येथे केवळ भेदभावाचा अभाव असणे एवढीच मर्यादित नाही तर ती सक्रिय समावेशकतेची असायला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला आपली क्षमता पूर्णत्वाने विकसित करण्याची संधी मिळाली पाहिजे ही त्याची अपेक्षा आहे. समाजातील प्रत्येक अडथळा दूर करून परस्पर आदर आणि सहकार्याची भावना निर्माण करणे हीच खरी समता आहे.

म्हणूनच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या या दिवशी या महामानवाने ज्या मूल्यांसाठी आयुष्य वेचले त्या मूल्यांना स्थान देण्याची हीच खरी श्रद्धांजली ठरेल. ही मूल्ये इतिहासापुरती मर्यादित नाहीत, ती आजही जिवंत आहेत आणि आपल्या भविष्यास आकार देत आहेत.

समतापूर्ण समाज निर्माण करण्याचा प्रवास सोपा नाही पण तो अशक्य ही नाही. या महान परंपरेतून प्रेरणा घेत आपण अन्यायाला आव्हान देऊ शकतो आणि समानतेवर आधारित समाज उभारू शकतो. बोधिसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करताना आपण त्या अखंड सामाजिक जागृतीच्या परंपरेलाही अभिवादन करतो, जी बसवेश्वरांच्या वचनांतून आणि आपल्या संविधानातून प्रकट होते. ही परंपरा आपल्याला सांगते की अन्याय स्वीकारायचा नाही, समानता प्रस्थापित करायची आहे आणि बंधुत्वाच्या आधारावर समाज घडवायचा आहे. ही जबाबदारी प्रत्येकाची आहे आणि ती पार पाडणे हेच आपले कर्तव्य आहे.



**देवगिरी मिरर**
मंगळवार, दि.१४ एप्रिल २०२६



# डॉ.बाबासाहेबांचा प्रेरणेतून समाजाने लेखणी हातात घेतली

## जिल्हाधिकारी राहुल कर्डिले : जिल्हास्तरीय शांतता समितीची बैठक संपन्न

नांदेड ( प्रतिनिधी) :- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून समाजातील नागरिकांनी लेखणी हातात घेतली आहे. त्यामुळे शिक्षणातून समाजाची मोठी प्रगती झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने त्यांचे विचार समाजात गेले पाहिजे. त्यासाठी आपण निरंतर वाचन केले पाहिजे, असे आवाहन जिल्हाधिकारी



राहुल कर्डिले यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या अनुषंगाने समाजात शांतता व सलोखा राखणे ही सर्वांची जबाबदारी आहे. त्याअनुषंगाने जिल्हास्तरीय शांतता समितीची बैठक आज जिल्हा नियोजन भवन येथे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले, महापौर श्रीमती कविता मुळे, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर पोलीस अधिक्षक सुरज गुरव, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्यासह जिल्हास्तरीय शांतता समितीचे विविध स्थायी- अस्थायी सदस्य, निमंत्रीत सदस्य, विविध धर्मगुरू, नागरिक, पत्रकार आदींची उपस्थिती होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त जिल्हा प्रशासनाने विविध चांगली व्यवस्था केली आहे. नांदेड जिल्हा हा चळवळीचा जिल्हा असून विविध सामाजिक कार्यक्रमात, प्रशासनात समाजाचा एकत्रीत सहभाग मोठा असतो. मोठ्या आवाजातील डिजे ऐवजी लेझीम सारखे उपक्रम हाती घेऊन तणाव कमी करून आनंदात आपण जयंती उत्सव साजरे करू या, असे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यात सीसीटीव्ही प्रणाली आवश्यक असून यासाठी प्रयत्न चालू आहेत. शांतता समितीच्या बैठकीत महिलांचा अधिक सहभाग वाढवण्यासाठी प्रयत्न केला जाईल. नांदेड जिल्ह्यातील कायदा सुव्यस्थेबाबत बैठक काही दिवसात घेतली जाईल. यात विद्यार्थ्यांसह महाविद्यालयाचा सहभाग असेल. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त जिल्ह्यात सर्व नागरिकांना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शुभेच्छा दिल्या.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर समाजाने चालावे. यासाठी समता, बंधुत्व, एकोप्यातून जयंती आपण साजरी करू या. जयंती काळात युवकांवर योग्य जबाबदारी दिली पाहिजे. उन्हापासून नागरिकांची काळजी घेतली पाहिजे. यासाठी मनपाचे सर्व सहकार्य राहील, असे महापौर कविता मुळे यांनी सांगितले.

सर्वांच्या चांगल्या चर्चेतून योग्य नियोजन पोलीस प्रशासनाकडून केले जात आहे. मिरवणूक मार्गात, परिसरात संपूर्ण व्यवस्था चांगली राहील. मार्गात कोणताही अडथळा येणार नाही याची दक्षता पोलीस विभागाकडून घेतली जाते. यासाठी पोलीस प्रशासन तत्पर असल्याचे पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितले. नांदेड जिल्ह्याची चांगली प्रतिमा कायम आहे. यासाठी आपल्या सर्वांचे योगदान मोलाचे आहे. कायदा सुव्यवस्था चांगली ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आपण उत्साहात साजरी करू या. यासाठी पोलीस प्रशासनाने योग्य नियोजन केले आहे. नागरिकांना कोणतीही अडचण आल्यास तात्काळ ११२ या टोलफ्री नंबरवर संपर्क साधावा. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त युवक-विद्यार्थ्यांसाठी १८ तास अभ्यासाचा उपक्रम पोलीस प्रशासनाच्यावतीने साजरा केला जाणार आहे. यात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

जिल्हा प्रशासनाने दिलेल्या विविध सूचनेसह नागरिकांना जयंती काळात कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता मनपाकडून घेतली जाईल, असे मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी सांगितले. यावेळी बैठकीत विविध सदस्यांनी उपयुक्त सूचना दिल्या. मिरवणुकीद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी अनेक नागरिक बाहेर पडतात. त्यांची सुरक्षा, आरोग्य, पाणी व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरा, स्वच्छता आदी विषयांबाबत सदस्यांनी मनोगत व्यक्त केले. विविध विभागांने करावयाच्या व्यवस्थेबाबत सविस्तर चर्चा या बैठकीत करण्यात आली.

निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी प्रास्ताविकात बैठकी विषयी माहिती दिली तर सदस्य सचिव तथा अपर पोलीस अधिक्षक सुरज गुरव यांनी नांदेड जिल्ह्यात शांतता कायम राहण्यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. त्याअनुषंगाने शांतता समितीची बैठक शांततेत पार पडली असून उपस्थित सर्व सदस्यांचे शेवटी त्यांनी आभार मानले.










हे वृत्तपत्र मालक प्रकाशक संपादक राम गंगाराम तरटे यांनी मुद्रक नरसिंह पांडुरंग घोणे यांच्या मॅजिक पब्लिकेशन शॉप नंबर १० मनपा शॉपिंग कॉम्प्लेक्स गांधी चौक लातूर जिल्हा लातूर- ४१३५१२ येथे छापून घर क्रमांक १ , मुस्तापूर ता.नायगाव जिल्हा नांदेड ४३१६३२ येथे प्रकाशित केले आहे. RNI NO. MHMAR/25/A2579. Mob. No. 8177826043 , 8600852183.

This News Paper Has Owner, Publisher and Editor Ram Gangaram Tarte, Printed parmeshwar Narsihn Ghonase Magic Printars & Publication shop no.10, manapa shopping complex, Gandhi Chowk, Latur - 451335. Published at 1, mustapur, tq.Naigaon, Dist. Nanded - 431632 ( MS ). RNI NO - MHMAR/25/A2579.